ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# मराठवाडयातील स्त्रियांच्या बोलीचा, समाजभाषा विज्ञानाच्या दृष्टीने विचार



डॉ. विद्या पाटील
सहयोगी प्राध्यापक,
मुळजी जेठा महाविद्यालय,जळगांव.


## साराशं

आपल्या मनातील भाव आणि विचार व्यक्त करण्याचे भाषा हे एक महत्त्वाचे साधन आहे. भाषेच्याव्दाराच लोकसमुह आपल्या अस्तित्वाचा आविष्कार करीत असतो. लोकसमुहाच्या जगण्यातून येणा—या शब्दांनी भाषेची जडण—घडण होत असते. भाषेत लोकसमुह ज्या भूप्रदेशावर राहतो, तेथील भौगालिक विशेष, लोकसमुहाच्या परंपरा, रुढी—प्रथा संदर्भ त्यांच्या भाषेत स्वाभाविकपणेच असतात. लोकसमूहाच्या या वैविध्यातूनच भाषेला एक वेगळेपण प्राप्त होत असते. बोलणा—या लोकसमुहाच्या नावाने भाषा ओळखली जाण्यात गैर नाही जसे सुताराची भाषा, गवंडयाची भाषा, कुणब्याची भाषा कारण सर्वांच्या भाषेत त्यांच्या दैनंदिन क्रियांशी संबंधित शब्द असतात. याप्रमाणेच स्त्रियांची भाषा असेही म्हणता येते.

निसर्गानेच स्त्रियांना दिलेल्या वेगळेपणातून, या वेगळेपणाने त्यांच्या वाटयाला आलेल्या जगण्यातून, त्यांच्या भाषेतही एक वेगळेपण आलेले प्रत्ययास येते. जसे न्हाण येणे, कावळा शिवणे, डोहाळे यासारखे शब्द स्त्रीचे शरीरनिष्ठ अनुभव सांगणारे आहेत.

पारंपारीक पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने, स्त्रियांना चुल आणि मुल असे कार्यक्षेत्र ठरवून दिल्यामुळे, पुरुषांच्या अनुभवक्षेत्रापेक्षा स्त्रियांचे अनुभवक्षेत्रही काहीसे वेगळे ठरते स्त्रीच्या कार्यक्षेत्रानुसार अनुभवानुसार त्यांच्या भाषेतून व्यक्त झालेले आहे.

स्त्रियांचे भाषिक विनिमय, त्यांचे गूंज या भाषेतून व्यक्त होते. या भाषेतील शब्द स्त्रीत्व युक्त असतात. स्त्रियांचे म्हणून जे विशिष्ट अनुभव असतात, ते सांगण्यासाठी या शब्दांची निर्मिती झालेली असते. याशब्दांना स्त्री समुहाचे संदर्भ प्राप्त झालेले असतात. स्त्री हा समाजाचाच एक घटक असल्याने स्त्रियांच्या या भाषेला, भाषेतील शब्दांना समाजभाषाविनाच्या दष्टिनेही महत्त्व आहे. स्त्रिया देणारे अनुभव, स्त्री जीवनातील आचार—विचार, रुढी—परंपरा, संकेत, स्त्रीच्या भाव—भावना, स्त्रीने पाळावयाचे विधी—निषेध, विधी—विधाने आणि समाजव्यवस्था यांचा अभ्यास समाजभाषाविज्ञानात महत्त्वाचा ठरतो.

मराठवाडयाच्या ग्रामीण भागातील स्त्रियांच्या बोलीचा त्यांच्या भाषेचे हे वेगळेपण प्रत्ययास येते. अर्थात मराठवाडयाच्या बोलीशी ही स्त्रियांच्या या बोलीचे एक नाते आहेच. स्त्रियांच्या बोलीतील शब्द स्त्रियांच्या स्त्री म्हणून आलेले अनुभव सांगणारे आहेत. पुरुषांच्या भाषेत हे शब्द प्रचलित नसतात. प्रचलित असण्याचे कारण ही नाही.

स्त्रियांच्या शारीरनिष्ठ अनुभवातून आणि त्यांच्या स्वयंपाकघराशी असलेल्या संबंधातून त्यांच्या वाटयाला आलेल्या जगण्यातून भाषेत त्यांच्या काही खास शब्दांची भर पडलेली आहे. मराठवाडयातील स्त्रियांच्या बोलीतील शब्द असे—

### १. स्त्रीचे शारीरनिष्ठ अनुभव सांगणारे शब्द/वाक्प्रचार

१. ऋतुप्राप्ती हा स्त्रीचा नैसर्गिक अनुभव. या अनुभवाचा निर्देश स्त्रियांत पुढीलप्रमाणे केला जातो— न्हाण येणे, पदर येणे, शहाणी होणे, नातू होणे, पालव येणे, वटी येणे, राघू बोलणे, कावळा शिवणे इत्यादी.
२. स्त्रीच्या गरोदर अवस्थेचा निर्देष पुढीलप्रमाणे स्त्रियांत केला जातो— चोरुन खाणे, कावळा मुका होणे, दोन जीवाची असणे, पाय जड होणे, निरी उंचावणे, पोटूशी असणे, कूस उजवणे.
३. गरोदरपणीचे विधी सांगण्यासाठी— चोळी घालणे, डोहाळे लागणे असे वाक्प्रचार प्रचलित आहेत.
४. स्त्री बाळंतपणाशी संबंधित शब्द — पाळणा हलण, ओली बाळंतीण, बाळंतणीची न्हाणी, बाळंतणीचे पतपाणी, शंक देण, पाचवी, नाळ कापणे, गुटी देणे, मध चाटविणे, बाळुते, पान्हा फुटणे, अंगावर पाजणे इत्यादी.

### २. विवाह/सौभाग्याशी संबंधित शब्द —

वांझपणा, बौहवण करणे, बांगडी वाढणे, पाढरे कपाळ, भांगेत गुलाल, काकण ढिले होणे, जोडवे वाजू न देता चालणे, पदर ढळणे, पदरात घेणे, पदर पसरणे, उष्टी हळद, वटी खोजणे, कंबळ, बाजिंदी, शिंदळ, छिनाल, चूडा, भंडवाडा, लेकुरवाळी, रांडपण, अहेवपण, केळवन, वटी, कूस, चांदवा, आवालूटणे, संक्रातीचे वाण, वाण देणे, सुगडे, नांदणे, ओटी भरणे, कुंकू लावणे.

### ३. स्त्रियांच्या दैनंदिन कामाचे स्वरुप सांगणारे शब्द —

न्हाउ—माखू घालणे, वेणी—फेणी करणे, सडा—सारवण, लिपणे—सारवणे, तुळशीला पाणी घालणे, धुणी—भांडी, चुल पेटविणे, निवडणे—टिपणे, जात्यावर बसणे, सटर—फटर, आंथरूण—पांघरुण घालणे, बाळाला थापटणे, खाउ—पिउ घालणे, आव—भगत करणे, केर—कचरा काढणे, गाडगी—मडकी लावणे, लुगडयाला दंड घालणे, वाळवण, तेल—वात करणे, इरजण लावणे.

### ४. स्वयंपाक घरातून भाषेत आलेले शब्द—

चूल पेटविणे, चुलीत लाकडे सरकविणे, दाळ शिजविणे, वल्हयावर भाजी ठेवणे, काठवट, पीठ मळणे, भाकरी थापणे, चून, सागुती, पाटा—वरवंटा, वाटण, घोळाणा, शेवया—बोटूळे, आकडी (न तापवलेले दूध), सोजी सपीट, आदण, इसान.

### ५. स्वयंपाक घरातील वस्तू, पदार्थ यांच्या गुणधर्मानुसार वापरल्या जाणा—या प्रतिमा —

साकर—सोजी (आई—मुलगी), मधाची घागर (आई), घडीची भाकर (आई), पिठी साखर (आई) गुळाचा खडा (भाउ मुलगा), खडी साखर (भाउ), पुरणपोळी, (आई मुलगी), गुळाची पोळी (आई मुलगी), जिरसाळीचा भात (भाउ), अंबाडयाची भाजी (आई), निरशा दुधाचा खवा (भाउ, मुलगा), दुधाची उकळी (पतीचा राग), चुलीतला इंगूळ (विस्तव रागीट पती), येलदोडा (पती) मिरचीचा ठेसा (सासू), आग—जंजाळ कोल्डयास (सासू)

### ६. स्त्रियांची वेशभूषा—वस्त्रालंकारविषयक शब्द—

कुंकवाची चिरी, बुचडा, टोपपदरी लुगडं, इरकतली लुगड, काळी चंद्रकळा, चोही, जरबुटयाची चोळी, खनाळं, कुंकवाचं बगव, कुंची, अंगड—टोपरं, गोठ—पाटल्या, पुतळयाची माळ, मणी—डोरलं, गळसरी, सरज्याची नथ, जोडवे, तोडे, मासोळी, बाजुबंद, चुडा, बांगडी, काकण इत्यादी.

## ७. स्त्रियांच्या बोलीतील अन्य शब्द—

दीट (दष्ट), भानवस (चुलीच्या मागचा कट्टा), रुखवत, सवाष्ण, भ्रतार, कंथ (पती), बया, मालन (आई), गडणी (मैत्रिण), शेजी (शेजारीण), मावळण (आत्या), नेणंती मुराळी, जिजीबाई (वयाने मोठी असलेली स्त्री), वसा (नेम), वैराळ (कासार), सय (आठवण), वसट (मांस), बंगाळ, (वाईट), इंद्रावन (वृंदावन), चोखट (चांगले), अगुचर (खटयाळ), नसानी (कटकट करणारी), नौती (नवतरुण), नेणंती (लहान, अज्ञान), वंज वंज (सावकाश), सटी (सटवाई)

## स्त्रियांच्या बोलीचे समाज भाषाविज्ञानाच्या दृष्टीने महत्त्व —

मराठवाडयाच्या ग्रामीण भागातील स्त्रियांच्या दैनंदिन जीवनात या प्रकारचे शब्द आहेत. या शब्दांची निर्मिती आणि प्रचलन प्रामुख्याने स्त्रियातच होत असते. या शब्दांत स्त्री—जीवनाचा अनुभव साठविलेला आहे. या शब्दात स्त्रीच्या शारीरनिष्ठ अनुभवाबरोबरच, तिच्या वाटयाला आलेल्या जगण्यातील अनुभवांचेही संदर्भ आहेत. निसर्गतः स्त्रीचे असलेले वेगळेपण, पुरुषप्रधान संस्कतीत तिला असलेले दुयम स्थान, स्त्रीकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन, सामाजिक परंपरा, तिची सुख दुःखे आणि जीवन जगण्याची तिची त—हा, तिच्या आवडी—निवडी असे अनेक संदर्भ मराठवाडयातील स्त्रियांच्या बोलीत पाहवयास मिळतात.

शब्द, त्यांचा अर्थ, त्यातून व्यक्त होणारा स्त्री—जीवनविषयक अनुभव, यातून स्त्रियांच्या बोलीचे एक वेगळेपण प्रत्ययास येते. स्त्रियांची ही खास बोलीभाषा त्यांच्या समूहापूरती मर्यादित असते.

मराठवाडयाच्या ग्रामीण भागातील स्त्रियांच्या बोलीच्या अभ्यासातून सामाजिक—सांस्कतिक पाश्र्वभूमीसह स्त्री—जीवनाचे अनेक पैलू लक्षात येवू शकतात. बोलणा—या लोकसमूहाच्या विविध वैशिष्टयातूनच भाषेचा रुप प्राप्त होत असते. हे लक्षात घेतले तर स्त्रियांच्या भाषेचे वेगळेपण आणि त्यांच्या भाषेचे समाज भाषा विज्ञानाच्या दष्टीने असलेले महत्त्व विचारात घेणे अगत्याचे ठरते.

## संदर्भः—

१. (डॉ.) भवाळकर तारा, स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर
२. (डॉ.) धोंगडे अश्विनी स्त्रीवादी समीक्षाः स्वरुप आणि उपयोजन.